महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०३ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०७२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मनोज जरांगेंनी उपोषण सोडलं

## आरक्षणाचा लढा यशस्वी ■ सरकारकडून मागण्या मान्य



मला कितीही शिव्या दिल्या, दोष दिले तरी मी सगळ्या समाजासाठी काम करणार. मराठा उपसमितीने एक चांगला तोडगा काढला आणि कायद्याच्या चौकटीत बसेल असा निर्णय घेतला अशी पहिली प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी झाल्यामुळे ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील त्यांना, त्यांच्या रक्तातील सर्वांनाच कुणबी सर्टिफिकेट मिळणार असल्याचं फडणवीसांनी जाहीर केलं. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी बोलत होते.

मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन सुरु केलं होतं. अशातच आज मराठा आरक्षण उपसमितीचे सदस्य राधाकृष्ण विखे पाटील, माणिकराव कोकाटे, शिवेंद्रराजे भोसले, उदय सामंत, गोरे यांनी आज मनोज जरांगे पाटलांची भेट घेतली. यावेळी मनोज जरांगे पाटलांनी सरकारने मान्य केलेल्या मागण्यांची माहिती दिली.



### ओबीसीचे आरक्षण संपुष्टात येणार - लक्ष्मण हाके



हैदराबाद गॅझेटच्या भाषेमध्ये काहीच फरक नाहीये. जी उपाययोजना केली आहे, ती राज्यातील ओबीसी आरक्षण संपवणारी आहे. राज्यात बोगस प्रमाणपत्र दिली जात आहेत. अगदी २५ हजार पासून ते लाख रुपयांपर्यंत याची किंमत आहे. हा जीआर काढायचा अधिकार सरकारला नाही. यामुळे ओबीसीचे आरक्षण संपुष्टात येणार आहे, असे वक्तव्य लक्ष्मण हाके यांनी केले आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन मागे घेण्यात आलं. मनोज जरांगे यांनी केलेल्या आठपैकी सहा मागण्या मान्य झाल्या. त्यामधील हैदराबाद गॅझेट लागू करण्याची प्रमुख मागणी मान्य झाली. त्याचा फायदा बहुतांश मराठ्यांना होणार आहे.

### मुंबई जाम करणे आम्हाला अवघड नाही - भुजबळ



ओबीसीतून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हैदराबाद गॅझेटचा आधार ते घेत आहेत, परंतु त्यात देखील मराठा आणि कुणबी वेगळे दाखवले आहेत. त्यावेळी, 1921 साली 2 लाख मराठा तिथ होते, तर 33 हजार कुणबी होते. देवेंद्र फडणवीस असोत की शरद पवार 50 टक्क्याच्या आत कोणीही आरक्षण देऊ शकत नाही. मुख्यमंत्री यांनी शब्द दिला आहे, ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही. मी कुणबी आणि मराठा वेगळे असल्याचे दाखले दिले आहेत. मुंबई जाम करणे आमच्यासाठी अवघड नाही, जर तुम्ही निर्णय घेतला तर आम्हाला देखील मुंबईला यावं लागेल, असे म्हणत छगन भुजबळ यांनीही ओबीसी आंदोलकांच्यावतीने मुंबई जाम करण्याचा इशारा दिलाय. उद्यापासून ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण नको ही भूमिका घेऊन राज्यभर आंदोलने केली जातील आणि निवेदन देखील दिल जाईल, असेही भुजबळ यांनी म्हटलं.

### मनोज जरांगेंच्या कोणत्या मागण्या मान्य?

- हैदराबाद गॅझेटची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी अशी मनोज जरांगे यांची मागणी होती. त्याला शासनाने मान्यता दिली आहे.
- गावातील कुळातील नात्यातील व्यक्तींना चौकशी करुन कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
- सातारा गॅझेटवर अभ्यास करून त्याला जलद मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी आहेत, एका महिन्यात त्या दूर करुन त्याला मान्यता देणार
- मराठा आदोलकांवरील या आधीचे गुन्हे सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येणार.
- शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय नोकरी देणार.
- मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये बलिदान दिलेल्या वारसांसाठी 15 कोटींची मदत देणार. आठवड्याभरात त्यांच्या खात्यात मदत जमा होईल.



थोडक्यात महत्वाचे



## ठाण्यात इमारतीचा स्लॅब कोसळला

### जीवितहानी नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

: ठाणे येथील किसन नगर क्र. २ मधील मस्जिद गल्लीमध्ये असलेल्या तिवारी सदन या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीचा स्लॅब मंगळवारी दुपारी कोसळला. या घटनेनंतर पालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण इमारत रिकामी केली असून यातील १७ रहिवाशांना ठाणे महानगरपालिका शाळेत तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्यात आले आहे. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही.

किसन नगर क्र. २ मधील मस्जिद गल्लीमध्ये तिवारी सदन हि इमारत तळ अधिक ३ मजली असून सुमारे ४० वर्षांपूर्वी बांधलेली आहे. ही इमारत सी २ बी (C2B म्हणजे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे.) प्रवर्गातील असल्याने आधीपासूनच धोकादायक स्थितीत असून, सद्यस्थितीत तिच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम सुरू होते. मंगळवारी झालेल्या घटनेत दुसऱ्या मजल्यावरील रीता प्रकाश उपाध्याय यांच्या मालकीच्या रूम क्रमांक ६ या खोलीचा स्लॅब कोसळला. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच ठाणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षासह सार्वजनिक बांधकाम आणि अतिक्रमण विभागाचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत संपूर्ण इमारत रिकामी केली आहे. इमारतीत राहणाऱ्या १७ रहिवाशांना तात्पुरत्या स्वरूपात ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक २३ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

## भिसोळच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण तालुक्यातील भिसोळ गावातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला या वर्षी ५० वर्ष पूर्ण झाले असून, गणरायाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष जल्लोषात साजरा होत आहे.

तालुक्यातील भिसोळ या छोट्याशा बहुजातीय आणि ९०% शेतकरी कुटुंब असलेल्या या गावात सोमवार दिनांक ०८ सप्टेंबर १९७५ रोजी श्री. मदन बाबूराव कथोरे, कै. सखाराम हरी कथोरे, कै. पुरुषोत्तम कथोरे, कै. गोपाळ कथोरे, कै. रामचंद्र कथोरे, कै. शिवराम पष्टे, कै. वसंत चोरगे, श्री. नाना कार्ले, श्री. शिवाजी ठाकरे, श्री. कान्हा सुरोशी, कै. कृष्णा कथोरे, कै. भिमाजी कथोरे आणि इत्तर ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नाने आणि सहकार्याने गावात एकात्मता नांदावी या संकल्पनेतून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्थापन करण्यात आलं. सर्वच जण सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असल्याकारणाने यथाशक्ती अर्थिक सहकार्याने दरवर्षी गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जातो, या मंडळाचे वैशिष्ट्ये हे आहे की हा मंडळ रजिस्टर केलेला नाही, मंडळाला ना कुणी अध्यक्ष, ना कुणी खजिनदार आणि ना कुणी पदाधिकारी आहे तरीसुद्धा सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागाने खेळीमेळीच्या वातावरणात हा उत्सव साजरा होतो. सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत असताना बरेचशे संस्थापक सदस्य हे मयत झालेले आहेत परंतु त्यांची दुसरी आणि तिसरी पिढीही हा वारसा खुप आनंदात आणि जल्लोषात पुढे चालवत आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला उत्तम नियोजन आणि उत्कृष्ट सजावट देखाव्यासाठी सन १९९७ साली ग्रामीण पोलिस स्टेशन मांडा-टिटवाळा यांच्याकडून उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले होते. या वर्षी सुवर्ण महोत्सवी असल्याकारणाने गणरायांचे वास्तव्य १० दिवसांसाठी असून, सुंदर अशा शंकर महादेवांच्या आकर्षक देखाव्याने बाप्पाचे मखर सजविण्यात आले आहे, "गजर हरिनामाचा" या संकल्पनेतून दररोज सुमधुर असे भजनाचे कार्यक्रम बाप्पासमोर समोर होत आहेत आणि याचा आनंद गावातील सर्व महिला, पुरुष, तरुण मंडळी घेत आहेत.

## मुरबाड तालुक्यातील ग्रामसभांमध्ये मतदार याद्यांचे वाचन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर:** मुरबाड तालुक्यातील मतदार यादीत वाढलेल्या गोंधळावर प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. तालुक्यातील प्रत्येक गावात होणाऱ्या ग्रामसभांमध्ये या मतदार याद्यांचे जाहीर वाचन करण्याचे आदेश तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी पंचायत समितीला दिले आहेत. त्यामुळे मृत, दुबार मतदारांची नावे सर्व ग्रामस्थ पाहू शकणार आहेत. त्यावर तात्काळ अंमलबजावणीची अपेक्षा आहे.

देशात गेल्या काही दिवसात काँग्रेसच्या वतीने मतचोरीच्या नावाने

### मतदार यादीतील गोंधळावर प्रशासनाचा तोडगा

निवडणूक आयोगाविरूद्ध मोठी मोहिम उघडली आहे. सध्या बिहारमध्ये काँग्रेसचे नेते राहूल गांधी यांनी याच विषयावर यात्रा काढत आहेत. यापूर्वीही अनेक वेळा राहूल गाधी यांनी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर विविध मतदारसंघांमध्ये मतदानाच्या दिवसाबाबत आणि मतदार यादीबाबत तक्रारी समोर आल्या होत्या.

अलीकडेच तालुक्यातील विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर बोगस नावे समाविष्ट झाल्याची तक्रार केली होती. अनेक मृत व्यक्तींची नावे अद्याप यादीत असल्याचे, तर काही जण कायमचे गाव सोडून गेले तरीही त्यांची नावे यादीतून वगळलेली नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे आगामी निवडणुकांमध्ये बोगस मतदानाची शक्यता वाढल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करत मुरबाड तालुका तहसील प्रशासनाने मतदार यादी शुद्धीकरण मोहीम सुरू केली आहे. ग्रामसभांमध्ये यादीचे वाचन करून नागरिकांकडून त्रुटी निदर्शनास आणून देण्याचे आवाहन तहसील कार्यालयाने केले आहे. गावागावांतील नागरिकांनी

ग्रामसभांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून चुकीची माहिती, मृत किंवा कायम स्थलांतरित व्यक्तींची - नावे यादीतून वगळण्यासाठी सहकार्य करावे. या मोहिमेचा उद्देश मतदार यादी अधिक पारदर्शक आणि अचूक बनवणे हा आहे, अशी माहिती मुरबाडचे तहसिलदार अभिजीत देशमुख यांनी दिली आहे.

## पालघर जिल्ह्यात ६२ प्राथमिक शाळा धोकादायक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील २९ जिल्हापरिषद शाळांमधील ६२ वर्गखोल्या धोकादायक असून त्यांचे निर्लेखन करून त्या पाडण्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचा आदेश जानेवारी २०२४ मध्ये पारित करण्यात आला आहे. त्यावर आजतागायत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्याने स्थानिकांनी जिल्हा



परिषदेच्या शिक्षण विभागाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. धोकादायक शाळांच्या दुरुस्तीसाठी मुहूर्त मिळालेला नसल्याने आजही विद्यार्थ्यांना गळक्या शाळेत जीव मुठीत घेऊन धडे गिरवण्याची वेळ आल्याची खंत पालकांनी व्यक्त केली आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील धोकादायक शाळांची संख्या चिंताजनक आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी भानूदास पालवे यांनी ३० जानेवारी २०२४ रोजी केलेल्या पाहणीमध्ये जिल्ह्यातील २९ जिल्हा परिषद शाळांतील ६२ वर्गखोल्या वापरास अयोग्य व धोकादायक असल्याचे घोषित केले होते. त्यानंतर तातडीने निर्लेखन करून पाडणी व नवीन इमारती उभारणीसाठी संबंधित विभागांना आदेशित करण्यात आले होते. मात्र या आदेशावर मागील पावनेदोन वर्षांत शून्य कार्यवाही झाल्याने विशेषतः आदिवासी बहुल तालुक्यातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.









## गणेशोत्सवानिमित्त दीपेश म्हात्रे आणि रवींद्र चव्हाण एकत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली मागील दोन वर्षाच्या काळात प्रत्येक मुद्द्यावर भाजप प्रदेशाध्यक्ष आणि डोंबिवलीचे भाजप आमदार रवींद्र चव्हाण यांना कैचीत पकडण्याचा प्रयत्न ठाकरे गटाचे डोंबिवली जिल्हाध्यक्ष दीपेश म्हात्रे यांनी केला. या कालावधीत ठाकरे गट आणि भाजपमध्ये समाज माध्यमांतून जोरदार धुमश्चक्रीचे वावटळ सुरू होते. हे वावटळ अलीकडे थोडे शांत झाले होते. याच कालावधीत मागे काय घडले हे न पाहता भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी माजी महापौर पुंडलिक म्हात्रे यांच्या डोंबिवलीतील नवनाथ कृपा या बंगल्यात ठाकर गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांची गणपती दर्शनाचे औचित्य साधून भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

या भेटीमुळे प्रदेशाध्यक्ष चव्हाण आणि जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या समर्थनार्थ समाज माध्यमांवर शाब्दिक युध्द खेळणारे कार्यकर्ते सर्वाधिक धारातिर्थी पडल्याचे चित्र आहे.

माजी केंद्रीय मंत्री कपील पाटील आणि पुंडलिक म्हात्रे हे नातेवाईक आहेत. या कौटुंबिक सहसंबंधातून दीपेश म्हात्रे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या जोरदार अफवा काही दिवसांपासून आहेत. प्रत्यक्षात असे काही नाही, असे दीपेश समर्थकांनी सांगितले. आगामी पालिका निवडणुकीचा विचार करता डोंबिवलीतील ठाकरे गटाचे सामर्थ्य जेमतेम आहे. पालिकेवर भाजपला आपला झेंडा फडकावयाचा आहे. सक्षम नेतृत्व असे दीपेश यांचे व्यक्तिमत्व आहे. या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गणपती दर्शनाचे निमित्त साधून दीपेश म्हात्रे यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात विशेषता शिंदे गटात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## उल्हासनगर मनपात ऑनलाईन तक्रार प्रणाली कार्यान्वित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** नळ तुटला, रस्त्यावर खड्डा पडला, कचऱ्याचा ढीग साचला किंवा अन्य नागरी समस्या उद्भवल्या तरी आता नागरिकांना महापालिकेची दारं ठोठवावी लागणार नाहीत. उल्हासनगर महानगरपालिकेने आधुनिक 'ऑनलाईन तक्रार निवारण प्रणाली कार्यान्वित करून नागरिकांना घरबसल्या एका क्लिकवर तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना आता तक्रारी करणे सोपे होणार आहे. ही प्रणाली शहरातील दैनंदिन अडचणींचे वेगवान आणि पारदर्शक निवारण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. नागरिकांनी नोंदवलेल्या तक्रारी थेट संबंधित विभागाकडे पोहोचतील आणि ठराविक कालमर्यादेत त्यावर कार्यवाही होईल, असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला आहे. कोणत्याही पालिकेत तक्रार करणे म्हणजे पूर्ण मोठे संघर्षाचे होते. मात्र नागरी समस्या सोडवण्याच्या दृष्टीने विविध माध्यमातून पालिका आता निर्णय घेत असताना दिसत आहे. उल्हासनगर महापालिकेनेही याच दृष्टीने नागरिकांसाठी नवी तक्रार प्रणाली उभारली आहे.

# 'घालीन लोटांगण' सुरू होताच स्वतःभोवती प्रदक्षिणा घालता ?

## पण त्या कवनाचा तसा अर्थच नाही!



सध्या गणेशोत्सव सुरू आहे. त्यानिमित्ताने सगळया देवादिकांच्या आरती मोठ्या भक्तिभावाने म्हटल्या जातात. ज्यांची आरती पाठ नसते, ते लोक 'जयदेव जयदेव' म्हणत ठेका धरतात. तास दोन तास आरती झाल्यावर वेळ येते शेवट करण्याची! त्यावेळी आपण जे पद म्हणतो तो संत नामदेवांनी लिहिलेला एक अभंग आहे. त्यातील समर्पित भाव पाहता तो अभंग आरती नंतर म्हणण्याचा प्रघात सुरू झाला.आरती म्हणजे आर्ततेने मारलेली हाक आणि त्याचा शेवट ज्या अभंगाने केला आहे त्यात देवाशी संवाद साधत नामदेवांनी म्हटले आहे, 'भगवंता, यदाकदाचित जेव्हा तू आम्हाला भेटशील तेव्हा मी तुझ्यासमोर लोटांगण घालेन आणि चरणांना वंदन करेन.'

हा भावार्थ लक्षात घेता 'घालीन लोटांगण' हे चरण सुरू झाल्यावर आणि आरती संपण्यापूर्वी स्वतः भोवती प्रदक्षिणा घालण्याची गरज नाही. तसे करण्याबद्दल शास्त्रात कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे आरती संपेपर्यंत देवाभोवती आणि स्वतः भोवती प्रदक्षिणा न घालता आरती पूर्ण करावी. नंतर मंत्रपुष्पांजली म्हणून झाल्यावर मंदिराला प्रदक्षिणा घालावी आणि नंतर देवासमोर साष्टांग नमस्कार घालावा. जिथे देवाभोवती प्रदक्षिणेसाठी जागा नसेल तिथे आरती संपल्यावर स्वतःभोवती प्रदक्षिणा घालून साष्टांग नमस्कार घालावा असे शास्त्र आहे.

**स्वतः भोवती प्रदक्षिणा घालण्याचा मंत्र :**
यानि कानि च पापानि जन्मांतरकृतानि च |
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणपदे पदे ||
हा मंत्र म्हणत तीन वेळा प्रदक्षिणा घालत प्रार्थना केली जाते, की 'हे देवा माझ्याकडून कळत-नकळत झालेल्या पापांचे क्षालन कर, केवळ या जन्मातलेच नाही तर मागच्या जन्मातील पापेही नष्ट कर.'

**लोटांगण :** स्वतःभोवती प्रदक्षिणा घालून झाल्यावर देवासमोर लोटांगण घालावे. लोटा अर्थात सपाट बुड असलेला तांब्या जसा जमिनीवर अलगद टाकला असता जसा घरंगळत जातो आणि वर्तुळाकार फिरतो, तसा देवासमोर देह टाकून डोक्याच्या वर सरळ रेषेत हात जोडून स्वतःभोवती लोळत लोळत देवाभोवती प्रदक्षिणा करणे म्हणजे लोटांगण. तसे करताना देवासमोर डाव्या बाजूला तीन वेळेस आणि उजव्या बाजूला तीन वेळेस लोळण घेणे आणि मूळ जागी येऊन साष्टांग नमस्कार घालणे याला लोटांगण घालणे असे म्हणतात. मात्र सगळ्या ठिकाणी किंवा घरगुती ठिकाणी लोटांगण घालण्यासाठी पुरेशी जागा नसते, अशा वेळी वरील श्लोक म्हणत आरती झाल्यावर स्वतः भोवती प्रदक्षिणा घालावी असे सांगितले जाते.

**साष्टांग नमस्कार स्त्रियांनी घालू नये :** साष्टांग नमस्कार म्हणजे ज्यात अष्ट अंग जमिनीला टेकतात त्याला सह अष्ट अंग अर्थात साष्टांग नमस्कार असे म्हणतात. यात डोकं, दोन्ही हात, दोन्ही पाय, हृदय, दोन्ही डोळे जमिनीला टेकतात. मात्र शास्त्रानुसार स्त्रियांनी पंचांग नमस्कार घातला पाहिजे. त्यात दोन गुडघे, दोन हात आणि डोकं जमिनीला टेकले पाहिजे. स्त्रियांनी आपले पूर्ण शरीर जमिनीवर पालथे पडू देऊ नये, म्हणून त्यांनी पंचांग नमस्कार करावा असे सांगितले आहे. त्यामुळे पुढच्या वेळी आरती झाली की सगळे प्रदक्षिणा घालतात म्हणून तुम्ही सुद्धा घालीन लोटांगण सुरु होताच प्रदक्षिणा घालू नका. आरती पूर्ण करा आणि आरती झाल्यावर इतरांनाही ही माहिती देऊन त्यांच्या ज्ञानात भर घाला!

# ठाणे जिल्हा प्रशासनाचा संकल्प : 'सेवा पंधरवडा'

## सेवा परमो धर्मः जनतेची कामे आता वेगवान..!

मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे

आपल्या दैनंदिन जीवनात महसूल विभागाशी संबंधित अनेक कामे असतात. कधी शेतजमिनीची नोंद, कधी घराचा उतारा, तर कधी सरकारी योजनेचा लाभ... ही कामे वेळेत आणि पारदर्शकपणे व्हावीत यासाठी ठाणे जिल्हा प्रशासनाने एक महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेतली आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत' राबवण्यात येणारा हा "सेवा पंधरवडा" सामान्य जनतेला दिलासा देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी वाढदिवसापासून (१७ सप्टेंबर, २०२५) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (०२ ऑक्टोबर, २०२५) हा 'सेवा पंधरवडा' राज्यभर साजरा होणार आहे. या कालावधीत, सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याच्या समस्या सोडवण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान पद्धतीने काम करणार आहे. या उपक्रमात राबवले जाणारे कार्यक्रम यापूर्वीही सुरू होते, परंतु या काळात ते युद्धपातळीवर आणि मोहीम स्वरूपात राबविले जातील.

यासंदर्भात शासनाने नुकताच एक निर्णय काढला असून, तो www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संकेताक २०२५०९०११०५७१५१६१९ या क्रमांकावर उपलब्ध आहे.

**या अभियानाचे स्वरूप तीन टप्प्यांमध्ये विभागले आहे:**

- **पहिला टप्पा: पाणंद रस्त्यांची मोहीम (१७ ते २२ सप्टेंबर)**

शेतकऱ्यांसाठी शेतापर्यंत पोहोचणारे रस्ते (पाणंद/शिवरस्ते) अत्यंत महत्त्वाचे असतात. अनेकदा रस्ते नसल्यामुळे किंवा ते खराब असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल घेऊन जाण्यासाठी अडचणी येतात. या काळात जिल्हा प्रशासन खालील गोष्टींवर विशेष लक्ष देणार आहे.

**रस्त्यांचे सर्वेक्षण आणि नोंदणी:** ज्या पाणंद रस्त्यांची नोंद अजूनही शासकीय दप्तरात (निस्तार पत्रक व वाजिब उल अर्ज) झालेली नाही, त्यांची नोंद घेतली जाईल. महसूल विभागाच्या शासन निर्णय क्र. लवेसू-२०२५-प्र.क्र.४५८ /भूमापन (ल-१), दि.२९.०८.२०२५ नुसार, पाणंद रस्त्यांना क्रमांक देण्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

**नकाशावर चिन्हांकित करणे:** अमरावती जिल्ह्यात राबवलेल्या यशस्वी प्रकल्पाच्या धर्तीवर, पाणंद रस्ते गाव नकाशावर चिन्हांकित केले जातील.

**रस्ते अदालत:** शेताच्या रस्त्यांमुळे होणारे वाद मिटवण्यासाठी आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी खास 'रस्ता अदालत' आयोजित केली जाईल. तसेच, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्रे घेतली जातील.

- **दुसरा टप्पा: 'सर्वांसाठी घरे' उपक्रम (२३ ते २७ सप्टेंबर)**

प्रत्येकाला स्वतःचे घर मिळावे, या उद्देशाने 'सर्वांसाठी घरे' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या काळात, जिल्हा प्रशासन खालील शासन निर्णयांची अंमलबजावणी करेल: (ग्रामविकास विभाग, निर्णय दि.१६.०२.२०१८), (नगर विकास विभाग, निर्णय दि. १७.११.२०१८), आणि (महसूल विभाग, शासन निर्णय दि. १४.१२.१९९८ व दि. ०१.०८.२०२५)

**पट्टे वाटप मोहीम:** घरे बांधण्यासाठी उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनी गरजू व पात्र लाभार्थ्यांना कब्जेहक्काने दिल्या जातील. तसेच, रहिवासी प्रयोजनासाठी असलेल्या शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित केली जातील.

**अतिक्रमणांचे नियमितीकरण:** महसूल विभागाच्या १४.१२.१९९८ च्या निर्णयानुसार, शहरातील जमिनीवरील गायरान नोंदी कमी करून, अतिक्रमणे नियमानुकूल केली जातील.

- **तिसरा टप्पा:नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर)**

या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी स्थानिक परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन काही नवीन उपक्रम राबवतील. यामध्ये नागरिकांच्या अडचणी दूर करणाऱ्या वेगवेगळ्या योजनांचा समावेश असेल.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार त्यांच्या स्तरावर सर्व संबंधित यंत्रणांसोबत बैठका घेऊन कामाचे नियोजन करतील. तसेच, या अभियानात स्थानिक आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्य यांनाही सहभागी करून घेतले जाईल.

या अभियानामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात येईल.

या 'सेवा पंधरवड्या'ला यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणा आणि नागरिकांनी देखील उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची निर्माल्य संकलन करून जनजागृती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा नेहमीच आपल्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून तसेच वरिष्ठांच्या मार्गदर्शनातून समाज हिताचे कार्यक्रम हाती घेत असतो. या गणेशोत्सवाच्या वेळी देखील एक समाज उपयोगी कार्यक्रम राबवण्यात आला. यामध्ये गणेश भक्तांना निर्माल्य हे नदीत न सोडता निर्माल्य कळशात टाकण्यासाठी आवाहन करण्यात आले; तसेच स्वयंसेवकांनी उत्साहाने गणेश भक्तांकडून ते जमा करून निर्माल्य कळशात टाकले तसेच हातात बॅनर घेऊन जनजागृती केले. सदर कार्यक्रम ३१- ०८- २०२५ रविवार रोजी सायंकाळी ६.०० वाजता टिटवाळा गणेश घाट परिसरात राबवण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे ,सचिव. मा. सौ. स्मिता घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, संचालक. डॉ.के. बी. कोरे प्राचार्य. प्राचार्य डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, NSS कार्यक्रम अधिकारी प्रा.दिनेश धनगर, प्रा. नाईक मॅडम NSS स्वयंसेवक या सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले.

# कल्याणमध्ये पोलिसांचा रुटमार्च





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण परिमंडळ ३ हद्दित गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद च्या अनुशंगाने कल्याण विभागात पोलिसांच्या वतीने रुटमार्च आयोजित करण्यात आला होतं. हा रूटमार्च महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दितील काळी मशिद चौक येथुन सुरु होऊन पुढे सहजानंद चौक, छत्रपति शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ पोलीस स्टेशन हद्दित प्रवेश करून शंकरराव चौक, अत्रे रंग मंदीर, गांधी चौक, जुने बाजारपेठ पोलीस स्टेशन कोकण मर्कंटाईल बँक, दुधनाका-विजय लॉन्ड्री, पारनाका टिळक चौक, अहिल्याबाई चौक, मोहिंदर काबुलसिंग चौक, लाल चौकी, दुर्गा माता चौक मार्गे गणेशघाट विसर्जनस्थळी ठिकाणी समाप्त करण्यात आला. या रूटमार्च मध्ये पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्यासह ४ वपोनि, २१ पीएसआय, ११० पोलिस अंमलदार, १ एसआरपी प्लॅटून, २ सेक्शन आणि ४ पीटर मोबाईल, ४ सीआरएम मोबाईल, ४ पीसीआर मोबाईल, १ स्ट्राइकिंग मोबाईल सहभागी झाले होते.

# बाप्पाच्या प्रसादासाठी मिठाई ऐवजी फलाहार आरोग्यदायी - सी.आर.म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणपती बाप्पाचा आगमनानंतर प्रत्येक घरात,सार्वजनिक मंडळात नैवद्य ,प्रसादाची रेलचेल मोठ्याप्रमाणात दिसून येते.पूर्वी घरगुती प्रसाद ,याची परंपरा होती कधीतरी मिठाई दिसायची,जास्तीतजास्त फुटाणे दिसायचे. असलं तर एखादा कंदी पेढ्याचा बॉक्स असायचा,आत्ता मात्र एक फॅशन दिसते मिठाई शिवाय दर्शन पूर्णत्वास जात नाही.पूर्वीच्या पेढ्यात, जिलेबीत, लाडू मध्ये भेसळ नसायची ,मात्र आत्ताच्या युगात मिठाईत साखरेचे प्रमाण मोठ्याप्रमाणात असते. ते नक्कीच आरोग्यास धोकादायक आहे अशी माहिती पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी सांगितले

साखरेमुळे मधुमेह,वजन वाढणे, दातांचे आजार,अनेक समस्या निर्माण होतात,मात्र हे सण म्हणजे मिठाई व्यापाऱ्यांची उत्पन्न वाढविण्याची नामी संधी मिळते.साखरेचे कमी भाव ,मिठीत मात्र ही साखर भाव खाऊन जाते. अगदी हजारोच्या किंमतीत, मिठाईत सुकामेवा,शुद्ध तूप याचे प्रमाण कमी मात्र कृत्रिम रंग,गंध,यामुळे ग्राहक लगेचच आकर्षित होतात.अती साखर यामुळे वरीलप्रमाणेच लठ्ठपणा, मधुमेहाला, हृदय विकाराला आमंत्रण देतात.या उलट फळांचा प्रसाद नैसर्गिक ,शुद्ध पौष्टिक असतो,फळातील खनिजे जीवनसत्वे फायबर हे शरीराला पोषण देतात,त्यामुळे हा प्रसाद ,लहानापासून, ज्येष्ठांपर्यंत सर्वांना आरोग्यदाई ठरते. केळी,डाळिंब,अननस,सफरचंद,नारळ, खजूर,मनुका हे आरोग्यासाठी लाभधारक ठरतात.हेच प्रसादात असायला पाहिजे...बाप्पाचा प्रसाद मोदक यामध्ये नारळ, गुळ, वेळची हे उत्तम पदार्थ असतात.धार्मिक भावनेबरोबर आरोग्याची जपणूक पण महत्वाची ठरते.गणपती बाप्पा हे विद्या,विवेक,आरोग्याचे प्रतीक मानले,बाप्पाचे लंबोदर नाव याचेच प्रतीक आहे.फलाहाराचा वापर प्रसादासाठी जर प्रत्येकाने करायचा ठरविला तर नक्कीच आरोग्यासाठी ,कुटुंबासाठी. लाभधारक ठरेल. मिठाईला २४ तासाची मुदत असते, फ्रिज मध्ये पण ती ठेऊ शकत नाही,फळांचे तसे नसते.

आजचे उत्सव व्यापारीकरणाकडे झुकलेले दिसते.मिठाई,सजावट,फटाके, बॅनर, कर्कश वाद्ये, या सर्वे व्यापारी जास्त नफ्यात दिसतात.बाप्पाचा प्रसाद घरीच तयार केला पाहिजे,वेळ नसला तरी पण वेळ काढून विविध प्रकारचे प्रसाद घरी बनविले येत आपण नक्कीच इतरांच्या आरोग्याची काळजी घेतली असे होईल.कारण मिठाईतील मावा भेसळ युक्त असतो हे नक्कीच.
प्रत्येक उत्सव हा पर्यावरण पूरक असायला पाहिजे,आपणच आपली ,आपल्या निसर्गाची काळजी घेतली पाहिजे, सण येतात जातात मात्र पोषण युक्त पदार्थ खाण्यात न आल्याने तदनंतर आरोग्याचा समस्या वाढतात, आणि मग पुन्हा डॉक्टर, पैशाचे मेळ बसवताना दमछाक होते.म्हणून आपणच आपल्या आरोग्यास जपणारे फलाहार याचा जास्तीत वापर प्रसादात केला पाहिजे.गूळ,खोबरे जरी प्रसादात वापरले तरी उत्तमच.असेही सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

# ठाणे येथे भटके विमुक्त दिवस साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : इतर मागास बहुजन कल्याण, ठाणे येथे 31 ऑगस्ट 2025 रोजी पहिला भटके विमुक्त दिन साजरा करण्यात आला.

महामानवांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी व कर्मचारी, समाज कल्याण ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, महामंडळ अधिकारी कर्मचारी तसेच विविध योजनांचे लाभार्थी, सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.


इतर मागास बहुजन कल्याण, ठाणे अंतर्गत असलेल्या आश्रमशाळांवर विद्यार्थी फेरी, रांगोळी स्पर्धा, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, निबंध स्पर्धा इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले, असे इतर मागास बहुजन कल्याण, ठाणे, सहायक संचालक यांनी कळविले आहे.

# महावीर हाईट्स संकुलात गणेशोत्सव साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : खडकपाडा, कल्याण (पश्चिम) येथील महावीर हाईट्स को. ऑप. हौ. सोसायटी लि. येथे ५ दिवसांचा गणपती उत्सव मोठ्या उत्साहात व अतिशय सुंदररित्या साजरा करण्यात आला. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत तसेच महिला वर्गासह सर्व रहिवाशांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन वातावरण अधिक रंगतदार करण्यात आला. सोसायटीतील सदस्यांच्या उत्साही सहभागामुळे हा सोहळा अत्यंत यशस्वीपणे पार पडला. या गणपती उत्सवामुळे सोसायटीमधील सर्व रहिवाशांमध्ये एकतेची भावना अधिक दृढ झाली. सोसायटीचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार व कार्यकारिणी सदस्य यांनी सर्व रहिवाशांचे मनःपूर्वक आभार मानले तसेच भविष्यातही अशीच एकजूट आणि साथ लाभावी, अशी आशा व्यक्त केली.







## आजचे राशि भविष्य

**मेष**
सर्वोत्तम कल्पना जाणून घेण्यासाठी खूप उत्सुक असतील. जे काही लोकांना पटवून द्यायचे आहे, ते तुम्ही सहजतेने मान्य करू शकता.

**वृषभ**
संध्याकाळचा वेळ कुटुंबासोबत घालवाल. या राशीचे लोक जे व्यवसाय करतात त्यांना आज आर्थिक लाभ होण्याची अपेक्षा आहे. बोलण्यापूर्वी विचार करा.

**मिथुन**
दिवस चांगला आहे. ज्या गोष्टींसाठी तुम्ही खूप दिवसांपासून प्रयत्न करत आहात ते आज पूर्ण होणार आहेत. कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल.

**कर्क**
तुमचा कल अध्यात्माकडे असेल आणि मंदिरात जाण्याची किंवा काही धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याची तुमची योजना असेल.घरात आनंद राहील.

**सिंह**
सर्जनशील कार्यात प्रसिद्ध व्हाल आणि तुम्हाला प्रसिद्धीही मिळेल. परंतु ते केवळ पैशाच्या बाबतीत फायदेशीर ठरतील. वेळेचं पालन करा.

**कन्या**
अनेक दिवस पूर्ण करण्याचा विचार करत आहात ते आज पूर्ण होईल. कोणाच्याही कामावर मत देणे टाळा आणि इतरांशी बोलताना जपून बोला.

**तूळ**
तुमच्या मनात नवीन कल्पना येतील, तुम्ही एखादा नवीन व्यवसाय सुरू करू शकता, ज्याचा तुम्हाला भविष्यात फायदा होईल. जबाबदाऱ्या पार पाडाल.

**वृश्चिक**
तुमच्या कार्यक्षेत्रात चांगले काम कराल. तुम्ही तुमच्या आई-वडील किंवा बहिणी आणि भावांसोबतही वेळ घालवू शकता. आरोग्य चांगले राहील.

**धनु**
नोकरीसाठी चांगली बातमी मिळू शकते.कंपनीत मुलाखतीसाठी बोलावले जाऊ शकते. नवोदित लेखकांसाठी आजचा दिवस चांगला असू शकतो.

**मकर**
कोणतेही काम करताना मन शांत ठेवल्यास तुमच्या कामात सहज यश येईल. आपण घाई केल्यास, सर्वकाही चुकीचे होईल.

**कुंभ**
प्रवासादरम्यान तुम्ही एखाद्या दूरच्या नातेवाईकाला भेटू शकता. ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न होईल. अभियंत्यांसाठी आजचा दिवस लाभदायक असेल.

**मीन**
ऑफिस मध्ये काही नवीन काम करण्याची संधी मिळू शकते. मित्रांसोबत मजा करण्यासाठी आणि मनोरंजनासाठी आजचा दिवस चांगला आहे.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

## शिवसेना ठाणे जिल्हा शाखा जिल्हास्तरावरील
# श्री गणेश दर्शन स्पर्धा २०२५ चा निकाल जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : वंदनीय शिवसेना प्रमुख हिंदूहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या सांस्कृतिक विचारांनी धर्मवीर आनंद दिघे साहेब यांनी सुरु केलेल्या श्री गणेश दर्शन स्पर्धेचे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ठाणे जिल्हा शाखा यांच्या विद्यमाने यंदाही जिल्हा स्तरावर आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कळव्यातील गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने साकारलेल्या 'रान शिकवतोय' या देखाव्याला प्रथम क्रमांक पारितोषिक प्राप्त झाला असल्याचे शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख खासदार नरेश म्हस्के व खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी जाहीर केले.

आपल्या संस्कृतीची जपणूक करणाऱ्या या अभिनव स्पर्धेचे ३३ वे वर्ष आहे. उत्सव साजरा करणाऱ्या संस्थांच्या उत्साहाला विधायक वळण मिळावे या व त्यातून समाज प्रबोधनाचे हिंदुत्व व राष्ट्रीयत्वाच्या भावना वाढीस लागाव्या या हेतूनेच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी नमूद केले.

श्री गणेश उत्सव म्हणजे लहान मोठे कलाकार निर्माण करण्याचा जणू कारखानांच...!

या कारखान्यातील कलाकारांना "इन्सेटिव्हबोनस" देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न शिवसेना ठाणे जिल्हा शाखेने केला आहे. श्री गणेश दर्शन स्पर्धा ठाणे जिल्हा क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. इकोफ्रेन्डली व पर्यावरण मुक्त शाडुची मुर्ती बनविणाऱ्या ठाणे जिल्हातील मुर्तीकारांना विशेष प्राधान्य देण्याचा विचार करुन श्री मुर्ती स्थापना करणाऱ्या मंडळांना व मुर्तीकारांना पारितोषिक जाहिर करण्यात येत आहेत. जेणेकरुन भविष्यात या बाबत सर्वच मंडळ विचार करतील या भावनेतून तज्ञ परिक्षकांनी या बाबतीत सुचना केल्या प्रमाणे हा निर्णय घेण्यात येत आहे.



## कळव्यातील गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ प्रथम क्रमांकाचे विजेते

विजयी स्पर्धकांना सुमारे रु. ७,००,०००/- रुपयांची रोख पारितोषिकांबरोबरच उत्कृष्ट स्मृतिचिन्हे देण्यात येतील. रौप्य, सुवर्ण आणि हिरक महोत्सव इ. सातत्याने गणेशोत्सव साजरा करीत असतील अशा सर्व गणेश उत्सव मंडळांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

पारितोषिकांचा विचार करतांना मुर्तीची सुबकता व मांगल्य, आरास त्यातील विविध्य, नेत्रदिपकता व त्यातून प्रगत होणारी आशयगर्भता आणि देखाव्यातून प्रतित होणारे हिंदुत्व, राष्ट्रीयत्व आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव व बाबी प्रामुख्याने पाहिल्या आहेत. मंडळाचा उत्साह आणि उत्सव वाढविण्यासाठी ठाणे जिह्यातील सर्व मंडळांची कार्यशाळा घेण्यासाठी आणि उत्सवांना अधिकाधिक प्रोत्साहन देऊन सर्वोतोपरी मदत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. काही दिवसातच परिक्षक मंडळाच्या अभ्यास नंतर कार्यशाळेच्या आयोजनाची तारीख सर्व मंडळांना कळविण्यात येईल असे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी नमूद केले आहे.

या स्पर्धेसाठी ठाणे शहरातील विविध क्षेत्रातील तज्ञांचे परिक्षक मंडळ निवडण्यात आले होते. प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, प्रा. सुधीर चितळे, श्री. अरविंद दातार, श्री. उमेश पळणिटकर, श्री. किशोर नादावडकेर, प्रा. मंदार टिल्लु, डॉ. धनंजय पष्टे, डॉ. सिमा हर्डीकर, श्री. सुनिल श्रीधर जोशी, श्री. अमोल त्रिंबक आपटे, श्री. दिपक पाटील, श्रीमती. कल्याणी काळे, श्रीमती. दैवता पाटील, श्री. प्रकाश कांबळी, डॉ. समिधा गोरे, डॉ. प्रतिक्षा बोर्डे, डॉ. जे.बी. भोर, अॅड. अनुराधा परदेशी त्यांनी दिलेल्या निर्णयात कोणताही फेरबदल केलेला नाही. स्पर्धा अधिका निःपक्षपाती व्हावी म्हणून आम्ही व्यक्तीशः कोणत्याही मंडळाच्या सजावटीमध्ये भाग घेतला नसल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी नमूद केले.

शिवसेना ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने विलास जोशी, ज्ञानेश्वर गायकवाड, अनिल भोर, प्रमोद बनसोडे यांनी स्पर्धेचे योग्य नियोजन केले असल्याचे खासदार नरेश म्हस्के व खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी नमूद केले.

### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

प्रथम क्रमांक - गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळवा देखावा - रान शिकवतो , रू १,००,०००/-

द्वितीय क्रमांक - केदारेश्वर मित्र मंडळ, आनंदनगर, देखावा - आंतरजाल, रू. ७५,०००/-

तृतीय क्रमांक - ओमशक्ती विनायक मित्र मंडळ, देखावा - डिजीटल मनी ट्रॅप, रू. ५०,०००/-

चौथा क्रमांक - जय भवानी मित्र मंडळ, गोकुळनगर, देखावा - दहशतवाद, रू. २५,०००/-

पाचवा क्रमांक - शिवसम्राट मित्र मंडळ, देखावा - मंडळ आहे ना? , रू. २१,०००/- सहावा क्रमांक - एकविरा मित्र मंडळ, महागिरी रू. १५,०००/-

सातवा क्रमांक - सार्वजनिक उत्सव मंडळ, जयभवानी , देखावा - संस्कृती विरूद्ध विकृती, रू. १५०००/-

आठवा क्रमांक - उत्कर्ष मंडळ, हाजुरी देखावा - हुंडाबळी (वैष्णवी हगवणे) रू.१५०००/- , नववा क्रमांक - गोपाळ गणेश मंडळ आझाद नगर, देखावा - पर्यावरणहानी (स्वार्थी मनुष्यवृत्ती) रू. १५०००/-

दहावा क्रमांक - कोलबाड मित्र मंडळ, कोलबाड, देखावा - अवयवदान, रू.१५०००/-

### उत्कृष्ट सजावटकार पारितोषिक

काजूवाडी वैतीनगर रहिवाशी मित्र मंडळ, श्री सिद्धिविनायक चौक, काजूवाडी, ठाणे - बद्रीनाथ मंदिर, रोख २५,०००/-

### उत्कृष्ट श्री मुर्तीकार पारितोषिक

श्री नरेश पोहेकर - काजूवाडी गणेशोत्सव मंडळ (काजूवाडी मूर्ती) - रोख १०,०००/-

श्री. पराग पारधी - जय भवानी मित्र मंडळ, महाराष्ट्र नगर, वागळे इस्टेट, रोख १०,०००/-

### उत्कृष्ट संहिता लेखन पारितोषिक

गणेश क्रिडा मंडळ, गणेश गल्ली, रोड नं २२ किसननगर नं ३, वागळे इस्टेट - रोख रू १०,०००/-

### आदर्श गणेशोत्सव मंडळ पारितोषिक

श्री गणेशोत्सव मंडळ, लोकमान्य आळी, अहिल्यादेवी बागसमोर चरई, ठाणे - रोख रू १०,०००/-

### विशेष रोख पारितोषिक

१. शिवगर्जना मित्र मंडळ, वॉकरवाडी, उथळसर, ७ नं. शाळेचे मैदान, ठाणे - रोख रू १०,०००/-
२. डवलेनगर रहिवाशी सेवा संघ (गड संवर्धन)- रोख १०,०००/-
३. श्रीरंग सहनिवास गणेशोत्सव रोख रू १०,०००/-
४ बाल मित्र मंडळ (वागळेचा विघ्नहर्ता) (म- मराठी, म- महाराष्ट्र)- रोख रू १०,०००/-
५. शिवसाई मित्र मंडळ, केणीनगर, रोड नं.३४, वागळे इस्टेट, ठाणे रोख रू १०,०००/-
६. ओंकारेश्वर सार्व. गणेशोत्सव मंडळ, प्लॉट नं.६६ जवळ, म्हाडा वसाहत, स्वा. सावरकर नगर, ठाणे - रोख १०,०००/-
७.स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळ, गणेश व्यासपीठ, संकल्प इंग्लिश स्कूल शेजारी, सावरकर नगर, ठाणे - रोख १०,०००/-
८. शिवसेना शाखा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, खेवरा सर्कल, ठाणे

### गुणवत्ता पारितोषिक

१. आई जिवदानी मित्र मंडळ, जोगिला मार्केट, उथळसर, ठाणे , रोख रू १०,०००/-
२.जिज्ञासा मित्र मंडळ, साळवी हाऊस, दगडी शाळेसमोर, चरई, ठाणे,रोख रू १०,०००/-
३. स्नेहांकित मित्र मंडळ, यश आनंद सोसायटी, विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - रोख रू १०,०००/-
४. नवयुग मित्र मंडळ, कोपरी कॉलनी, पारशीवाडी, ठाणे (पूर्व) ,रोख रू १०,०००/-
५. ओम सन्मित्र मंडळ, बबनराव पडवळ विद्यालयासमोर, पडवळ नगर, वागळे इस्टेट, ठाणे- रोख रू १०,०००/-
६. श्री साईबाबा मित्र मंडळ, किसन नगर नं.२. संजय गांधीनगर, रोड नं. १६, वागळे इस्टेट, ठाणे.- रोख रू १०,०००/-
७. बाल मित्र मंडळ (वागळेचा विघ्नहती) कोनार्क सोसायटी, श्रीनगर, सेक्टर ६ व ७, श्रीनगर, ठाणे- रोख रू १०,०००/-
८. डवलेनगर सार्व. गणेशोत्सव मंडळ, लोकमान्य नगर पाडा नं.३. लोकमान्य बस डेपो मागे, ठाणे- रोख रू १०,०००/-

### उत्तेजनार्थ पारितोषिक

१. श्रीरंग सहनिवास गणेशोत्सव मंडळ, श्रीरंग विद्यालय, श्रीरंग सोसायटी, ठाणे - रोख रू १०,०००/-
२. विठ्ठल क्रिडा मंडळ, चैतीनगर, लोकमान्य पाडा नं. ३. ठाणे. रोख रू १०,०००/-
३. साई पिंपळ मित्र मंडळ, बिल्डींग नं. ११, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - रोख रू १०,०००/-
४. सिंधुरत्न मित्र मंडळ, भवानी चौक, शांतीनगर, रोड नं. २७. वागळे इस्टेट, ठाणे - रोख रू १०,०००/-

# सर्व्हिस रोडची दूरवस्था झाल्याने गणेशभक्तांचे खड्ड्यांतून स्वागत



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेली १६/१७ वर्षे झाली सुरु असून हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे सुरु असल्याचे अनेक दाखले प्रवाशी आणि वाहन चालकांसमोर आले आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवापूर्वी एका महिन्यात अनेक वेळा पाहणी दौरे करून गणेशोत्सवापूर्वी या महामार्गाचे तसेच सर्विस रोडचे काम पूर्ण होईल ही अपेक्षा प्रवाशांची अपेक्षाच राहिली.

पेण तालुक्यातील वडखळ जवळील बोरी फाटा येथे भले मोठे खड्डे पडले असून गणेश भक्तांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. या भल्यामोठ्या खड्यांतून वाहन चालवताना वाहन चालकाला कसरत करावी लागत आहे. पावसाच्या पाण्याने भरलेले खडयांचा अंदाज न आल्याने काही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मणक्याचे व कमरेचे आजाराला सामोरे जावे लागत आहे.

सर्व सर्विस रोडचे काम तर पूर्ण झाले नाहीच शिवाय जे काही काम झाले आहे त्या कामाची दयनीय अवस्था झाली असल्याने गणेशोत्सव काळात मुंबई गोवा महामार्गावरील सर्विस रोडची काही महिन्यात चाळण झालेली पाहायला मिळत आहे. कामाची चुकीची पद्धत, बांधकाम मंत्री, खासदार, आमदार स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधीत अधिकारी यांचे झालेले दुर्लक्ष यामुळे या महामार्गाच्या कामात अनेक प्रकारचे अडथळे येत आहेत. मागील तेरा वर्षांपासून रखडलेल्या या महामार्गाला मोठ्या प्रमाणात खड्डे देखील पडले आहेत. सर्विस रोड देखील खड्डुयांमध्ये गेल्याने स्थानिकांची एक प्रकारे दिशाभूलच झाली आहे.

पावसाळयात चिखल तर उन्हाळयात धूळ खात प्रवास केल्याशिवाय प्रवाशांचा प्रवासच पूर्ण होत नाही. अशा परिस्थितीत काम अर्धवट असून देखील काम पूर्ण झाल्याचे बॅनर्स झळकावून राजकिय श्रेय घेण्या पलीकडे काहीच केले नसल्याचे सर्वज्ञात आहे. अशा परिस्थितीत ज्या गणेशोत्सव काळात अनेक फेऱ्या मारून आम्ही या महामार्गावर किती लक्ष ठेऊन आहोत हे दाखवून देणारे बॅनर मात्र झळकत आसल्याचे दिसत आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तरी लवकरात लवकर सार्वजनिक बांधकाम खाते आणि राष्ट्रीय महामार्ग यांनी जातीने लक्ष देऊन या रस्त्यावरील खड्डे बुजवावेत अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# परराज्यातील दोन चोरटे आळेफाट्यात रंगेहात पकडले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : जुन्नर तालुक्यातील आळेफाटा पोलिसांच्या सतर्कतेमुळे परराज्यातील दोन सराईत चोरटे चोरी करताना रंगेहात पकडले गेले. या कारवाईत पोलिसांनी ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस निरीक्षक विश्वास जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २२ ऑगस्ट रोजी दुपारी साडे-दोनच्या सुमारास अभिषेक वसंत माळवे हे आळे येथील बँकेत व्यवहार करून परतत होते. त्यांनी आपली काळ्या रंगाची हँडबॅग कारमध्ये ठेवून घरासमोर गाडी पार्क केली. याचवेळी आरोपींनी गाडीची काच फोडून हँडबॅग चोरी केली.

दरम्यान, गस्त घालत असलेल्या आळेफाटा पोलिसांना बँकेबाहेर होंडा शाईन (क्र. एम.एच. १७ सी.ई. ०३६३) वर दोन इसम संशयास्पद हालचाल करताना




दिसले. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून दोघांना पकडले. चौकशीअंती त्यांची नावे — गुंजा हनूमंधू (२२, रा. अलीमडगू, जि. नेलोरे, आंध्रप्रदेश) माधव सुंदरम गोगला (३८, रा. बीटरगुंटा, ता. कावली, जि. नेलोरे, आंध्रप्रदेश) अशी असल्याचे समोर आले.

**६५ हजारांचा मुद्देमाल जप्त**

दोघांकडून गुन्ह्यातील कबुली मिळाल्यानंतर पोलिसांनी ४० हजार रुपये किंमतीची होंडा शाईन मोटारसायकल व २५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही यशस्वी कामगिरी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या नेतृत्वाखाली पो. हवा. विनोद गायकवाड, पंकज पारखे, अमित मालुंजे, भिमा लोंढे, पो. कॉ. नविन अरगडे, ओंकार तुणे व गणेश जगताप यांनी केली.

# रास रंग - २०२५ शारदीय नवरात्र उत्सवाच्या कामाचे भूमिपूजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने २०१७ पासून दरवर्षी डोंबिवली पूर्वेतील डीएनसी शाळेच्या मैदानावर "रास रंग शारदीय नवरात्र उत्सव" भव्यदिव्य पद्धतीने आयोजित केला जात आहे. या उत्सवामध्ये दरवर्षी विविध मान्यवर नेतेमंडळी, दिग्गज कलाकार, दांडिया प्रेमी व हजारो दुर्गाभक्त उपस्थित राहून



उत्सवाची शोभा वाढवतात. यावर्षीचा रास रंग – २०२५ शारदीय नवरात्र उत्सव २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत डीएनसी शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. आज, मंगळवारी रास रंग नवरात्र उत्सवाच्या स्टेज व मंडपाच्या कामाचा भूमिपूजन समारंभ डीएनसी शाळेच्या मैदानावर संपन्न झाला.

या भूमिपूजन समारंभाचे पूजन शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, महिला जिल्हा संघटक लता पाटील, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, युवा सेना जिल्हा प्रमुख जितेन पाटील, श्री नवदुर्गा युवा मंडळाचे सोमिल खिमसरीया व सेक्रेटरी हिमांशू शहा यांच्याहस्ते, श्री गणेशाला श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावर्षीच्या नवरात्र उत्सवामध्ये देखील देशातील सुप्रसिद्ध नैतिक नागडा यांच्या ऑर्केस्ट्राच्या तालावर दांडिया आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी दांडिया प्रेमी व दुर्गाभक्त नागरिक बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांनी केले आहे.




# साश्रूनयनांनी गणपती बाप्पाला निरोप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या. या जय घोषात वाशिंद परीसरातील गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. या वेळी कोणताही अनूचित प्रकार घडू नये म्हणून वाशिंद पोलीस ठाण्याच्या वतिने चोख बंदोबस्त ठेवण्यात होता.

सात दिवसाच्या घरघूती गणेशाचे विसर्जन करण्यात आले. या बरोबरच गवराईचेही विसर्जन करण्यात आले होते. खातिवली गावाजवळील बंधा-यात गणपती विसर्जन करण्यात आले. विसर्जन मिरवणूकीत ढोलटासे, विविध प्रकारच्या फटाक्यांची हातषबाजी करण्यात आली. या मिरवणूकीत पुरषांबरोबरच महिला व लहान मुलांनिही हजेरी लावली होती. विसर्जन स्थळावर निर्माल्य संकलन केले जात होते. विसर्जन स्थळी विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी वाशिंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरक्षक सचिन हुदळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## शिवनगरी गणेशोत्सवात
# 'भूमिपुत्र ठाण्याचा - आगरी कोळी बाण्याचा' सजावट





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मोहोने येथील नावाजलेल्या शिवनगरी गणेशोत्सवाचे यंदा ३७ वे वर्ष असून दरवर्षी येथे उत्तमोत्तम चलचित्र सजावट सादर केले जातात. यावर्षी आगरी - कोळी बांधवांवर आधारीत सजावट साकारली असून भूमिपुत्र ठाण्याचा - आगरी-कोळी बाण्याचा हि सजावट केली आहे. प्रख्यात चित्रकार अनिल गोवळकर यांनी सजावट साकारली आहे. हा देखावा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याची माहिती अध्यक्ष बळीराम जाधव यांनी दिली.

# एकादशीला विसर्जन होणारे कल्याणातील मानाचे मेळा गणपती

## गेली सव्वाशे वर्ष अविरत सुरू असलेली मेळा गणपतीची परंपरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : लोकमान्य टिळकांनी पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहुर्त मेळ रावल्या नंतर दुसऱ्या वर्षी कल्याण गावातही गावकीतील विविध ज्ञातीच्या गणपतीची स्थापना करून मोठ्या उत्साहात मानाच्या मेळा गपपती उत्सवाला सुरुवात झाली. गेल्या सव्वाशे हून अधिक वर्षा पासून कल्याण गावकीची मेळा गणपतीची परंपरा आजही अविरतपने अखंडित सुरू आहे कल्याण गावकीच्या मानाच्या मेळा गणपती उत्सवाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

१८९४ साली लोकमान्य टिळकांनी पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केल्या नंतर दुसऱ्या वर्षी १८९५ साली कल्याण गावातील सुभेदार वाड्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली. त्याकाळी देशप्रेमाने भारलेल्या तरुणांची एवढी मोठी संख्या कल्याणात होती. त्यानंतरच्या काळात वाणी, तेली, चांद्रसेनी कायस्थ प्रभू, खाटीक मंडळी, धनगर, पांचकळशी, गुजराथी, मराठे मंडळी वगैरे मंडळांनी आपापल्या समाजातर्फे हा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी मेळयाच्या स्वरूपात सुरू करण्यात आलेल्या या उत्सवाची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सवाच्या परंपरेला कल्याण शहरात प्रचंड महत्त्व आहे. गणेशोत्सवात आकर्षक सजावट आणि देखावे करण्यात कल्याणातील मंडळे आणि कार्यकर्ते मागे नसायचे. पण मुंबई, पुण्यातील गणेशोत्सव





देखाव्यांचे कौतुक त्यांनाही असे. अर्थात मंडळाचा गणेशोत्सव असल्याने मुंबई, पुण्यातील देखावे पाहण्यासाठी जाणे शक्य नसायचे. अशा स्थितीत काही मंडळांनी एक नामी शक्कल काढली. एकादशीच्या दिवशी गणेशमूर्तीचे विसर्जन करून उरलेले दोन दिवस मुंबई-पुण्यातील गणेशदर्शनाला निघायचे, अशी परंपराच कल्याणमध्ये सुरू झाली.

भाद्रपद मनाहिण्यातील गणेश चतुर्थी पासून ते एकादशी पर्यंत मेळा च्या गणपतीची स्थापना करून उत्सव साजरा केला जातो व या मेळा गपतीचे एकादशीला मोठ्या उत्साहात गाजत वाजत विसर्जन केले जाते. मंडळांच्या या गणरायांना मेळयाचे गणपती असे संबोधले जाऊ लागले. इतरत्र सहसा कुठे न आढळणारी एकादशीच्या विसर्जनाची परंपरा कल्याणमध्ये सुरू आहे. या गणपतींचे विसर्जन एकादशीच्या दिवशी केले जाते. प्रत्येक गणपतीचा मान ठरलेला आहे. मात्र काळाच्या ओघात अनेक मंडळे या मेळयातून बाहेर पडली असली तरी आजही १२ मंडळांचा मेळा गणेशोत्सव मंडळात समावेश आहे. हे सर्व गणपती आपापल्या मानाप्रमाणे विसर्जन मिरवणुकीत सहभागी होतात. प्रत्येकाचे नंबर ठरवून दिलेले असून त्या नंबरचा गणपती विसर्जनासाठी निघाल्यानंतर त्यापुढील गणपती या रॅलीत सहभागी होत असतो.

आचार्य अत्रे रंगमंदिरा पासून निघेणाऱ्या या विसर्जन मिरवणुकीत तेली मंडळी, वैश्य समाज मंडळ, धनगर समाज मंडळ, शाहू छत्रपती गणेशोत्सव मंडळ, नवजीवन गणेशोत्सव मंडळ, उदय गणेश मंडळ, बाल गणेश मंडळ, बच्चीराम तेली गणेश मंडळ, कुंभारवाडा गणेश मंडळ, गुजराती समाज मंडळ, हनुमान प्रासादिक गणेशोत्सव मंडळ, गजानन प्रासादिक मंडळ या १२ गणपतींचा सहभाग असतो. या गणपतीच्या मिरवणुका ढोल-ताशाच्या गजरात ठरवून दिलेल्या मार्गाने गणेश घाटावर मार्गस्थ होत असतात. शेवटच्या गणपतीचे विसर्जन दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत चालत असते. कल्याण गावकीच्या मेळा गणपती पाहण्यासाठी ठाणे,मुंबई,रायगड आदी जिल्ह्यातील गणेश भक्ताची रीघ लागलेली असते.

# 'हॅश टॅग बाप्पा' उपक्रमांतर्गत बाप्पांच्या भाविकांची सेवा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : माई मिडिया 24 आणि ब्रँड्स मेकर्स व मुंबईचा गणेशोत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने 'हॅश टॅग बाप्पा' उपक्रमांतर्गत डॉक्टर भूषण जाधव व शाखाप्रमुख शशिकांत पवार यांच्या सहकार्याने बाप्पाचे भाविक व सेवेकऱ्याच्या सेवेचा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हॅश टॅग बाप्पा' उपक्रमाच्या माध्यमातून यंदा प्रथमच गणेशोत्सवामध्ये मुंबईतील विविध भागांत एकूण ६० हजार पौष्टिक 'ग्रीक योगर्ट' चे वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.नुकतेच मरिन लाईन्ससह 'खेतवाडी गिरगांव' येथे गणेश दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना तसेच गणपती मंडळांना पौष्टिक 'ग्रीक योगर्ट' चे वाटप करण्यात आले.

शिवसेना उपनेते रविंद्र मिर्लेकर, माईमिडिया24 च्या शीतल करदेकर, चेतन काशीकर, प्रानुभूती फाऊंडेशनचे डॉ भूषण जाधव, मुन चॅरिटेबल ट्रस्ट चे रवी जैन, ब्रँड्स मेकरचे भरत शिंदे, समाज सेवक शशिकांत पवार, रोहित महाडिक यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. पुढील दोन तीन दिवसात लालबाग, फोर्ट, दादर, सांताक्रूझ, अंधेरी, या ठिकाणी 'ग्रीक योगर्ट' चे वाटपाने आगळावेगळी सेवा गणेशचरणी रुजू होणार आहे.

# पु ल कट्टा संयोजक रमेश करमकर यांचे निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : मध्य रेल्वे कामगारांचे ३०-३५ वर्षे युनियन सेक्रेटरी म्हणून लढा देणारे आणि मध्य रेल्वे कर्मचारी पतपेढीत कार्यरत राहून असंख्य कामगारांना मदत करून एक लोकप्रिय कामगार नेता अशी ख्याती मिळवून सेवानिवृत्त झाल्यानंतर कल्याण मधील साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या पू ल कट्टा कल्याण या संघटनेचे संस्थापक सदस्य होते. पु ल कट्ट्याने आयोजित केलेल्या बालकला संमेलन पोलीस प्रतिभा संमेलन पु ल देशपांडे जन्मशताब्दी उत्सव अशा अनेक मोठमोठ्या उपक्रमात आपले वय विसरून तरुणांच्या बरोबरीने त्यांनी सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणारे रमेश करमरकर यांचे नुकतेच वयाच्या ८३ व्या वर्षी पुण्यात अकस्मात दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात मुलगी सुप्रसिद्ध तबला वादक स्वप्नगंधा करमरकर आणि पत्नी राष्ट्र सेविका समितीच्या स्नेहल करमरकर असे असून, सेवानिवृत्तीनंतर त्यांनी लेखन साधनेत स्वतःला झोकून दिले. 'गुंफियेला शेला' या पुस्तकाद्वारे त्यांनी आपले संपूर्ण लेखन जतन केले. तर श्री रेणुका कला मंदिरासाठी केलेल्या त्यांच्या लेखनामुळे संस्थेला अभूतपूर्व यश लाभले आहे. दिनांक 1 सप्टेंबर रोजी त्यांचे गावदेवी चौक येथील निवासस्थानावरून अंत्ययात्रा निघून लाल चौकी स्मशान भूमी येथे विद्युत दाहिनी मध्ये त्यांचा अंत्यविधी करण्यात आला त्यांची कन्या स्वप्नगंधा करमरकर यांनी आपले वडिलांच्या चितेला मंत्राग्नी दिला. अंत्यविधी करिता पु ल कट्टा प्रतिनिधी आणि इतर सामाजिक संघटना तसेच राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे प्रवीण देशमुख यांनी श्रद्धांजली अर्पण करून शांती मंत्राचे पठण केले.

# प्रबोधनात्मक भित्तिपत्रके लावल्यावरून सनातनच्या साधकाचा पोलिसांकडून छळ!

## दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाईची सनातन संस्थेची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील शिवडी परिसरात 'आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा' अशा आशयाची प्रबोधनात्मक भित्तिपत्रके लावणाऱ्या श्री. संदीप हरिश्चंद्र शिंगाडे या सनातनच्या साधकाला किडवाई मार्ग पोलिसांनी कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेशिवाय ताब्यात घेऊन दीड तास त्यांचा छळ केला. पोलिसांच्या या मनमानी आणि दडपशाहीचा आम्ही सनातन संस्थेच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करतो. या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आणि मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली.

२६ ऑगस्ट २०२५ या दिवशी रात्री ७:३० वाजता 'आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा' या विषयाचे भित्तिपत्रक लावत असतांना कोळेकर, कांबळी आणि रामसिंग या नावाच्या पोलिसांनी सनातनचे साधक श्री. शिंगाडे यांना कोणतेही वॉरंट किंवा कारण न देता जबरदस्तीने पोलीस ठाण्यात नेणे; रात्री ९ वाजेपर्यंत घाडगे नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने चौकशीच्या



नावाखाली त्यांच्या मानसिक छळ करणे; चौकशीदरम्यान धमक्या देणे; वैयक्तिक मोबाईल काढून त्यातील वैयक्तिक माहिती घेणे; त्यांच्या फोनमधील कॉल लॉग्स व वैयक्तिक कागदपत्रांचे फोटो काढणे; साधकाला त्यांच्या वकिलाशी वा कुटुंबियांशी संपर्क साधू न देणे; तसेच रात्री ९ वाजता त्यांना कोणताही कागदोपत्री पुरावा न देता सोडून देणे, ही संपूर्ण कारवाई 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' (BNSS) च्या कलम ३५ चे सरळ उल्लंघन करणारी आहे. तसेच हा पोलिसांनी केलेल्या अधिकारांच्या दुरुपयोगाचा गंभीर नमुना आहे, असे श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की , गणेशोत्सवाच्या काळात गणेशपूजनाचे शास्त्र, गणेशाची कृपा कशी संपादावी, आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा, याविषयी प्रबोधन करणे गुन्हा आहे का ? हा भारतीय संविधानाने दिलेल्या हिंदूंच्या धार्मिक स्वातंत्र्यावर पोलीस प्रशासनाने घातलेला घाला आहे. कधी पोलिसांनी मुसलमान अथवा ख्रिश्चन धर्मियांना त्यांच्या धार्मिक कृतीविषयी माहिती सांगतांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊन छळ करण्याचे धाडस केले आहे का ? याचे उत्तर किडवई मार्ग पोलिसांनी जनतेला द्यावे ! हिंदू सणांच्या वेळी हिंदूंची ही मुस्कटदाबी आम्ही कदापी सहन करणार नाही. जर दोषी अधिकाऱ्यांवर मुंबई पोलीस आयुक्तांनी तात्काळ कायदेशीर कारवाई केली नाही, तर आम्ही या विरोधात महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करू, तसेच दोषींना शिक्षा होईपर्यंत सनातन संस्था या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणार आहे, असेही श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

# नागरिकांना तक्रारी सादर करण्यासाठी जिल्हा प्रशासनाचा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना व्हॉट्सअ‍ॅप व्दारे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडे तक्रारी/अडीअडचणी सादर करण्यासाठी 9930001185 हा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक जाहीर करण्यात येत आहे.

या क्रमांकावर व्हॉट्सअ‍ॅप (Whatsapp) द्वारे तक्रार नोंदविताना, तक्रार ज्या विभागाची आहे त्या विभागाचे नाव व्यवस्थित नमूद करावे तसेच तक्रारदाराने स्वतःचे पूर्ण नाव, निवासाचा पत्ता, ई-मेल व मोबाईल क्रमांकही नमूद करावा.

या व्हॉट्सअ‍ॅप (Whatsapp) वर आपल्या तक्रारीशी संबंधित नसलेले कोणत्याही प्रकारचे अनावश्यक शुभेच्छा संदेश, छायाचित्रे, व्हिडिओ वा अन्य मजकूर पाठवू नये. ही सुविधा कॉलिंगसाठी नसून केवळ मेसेजद्वारे आपली तक्रार नोंदविण्यासाठी आहे. मेसेजव्दारे प्राप्त तक्रारीची दखल घेण्यात येणार आहे.

तक्रारदाराने वारंवार एकाच स्वरुपाची तक्रार करु नये. एकाच वेळेस तक्रार पाठवावी, त्याची नोंद घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.) यांनी कळविले आहे.

# जागृती मित्र मंडळाने साकारली गणरायाची इकोफ्रेंडली मुर्ती




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मधील बेतुरकर पाडा येथील जागृती मित्र मंडळाने यंदा गणरायाची इकोफ्रेंडली नटराजाची मुर्ती साकारली असून हि मुर्ती आकर्षणाचा विषय ठरत आहे. गणेशोत्सवाचे या मंडळाचे ४० वे वर्ष असून गेल्या 13 वर्षांपासून या मंडळाने इकोफ्रेंडली गणपती ही संकल्पना सुरू केली आहे. या मंडळाची गणेश मूर्ती इकोफ्रेंडली असते. या मूर्तीचे मुर्तीकार यतीन जाधव असून यंदा देखील या मंडळातर्फे चौथऱ्यासह आठ फुटांचा इकोफ्रेंडली बाप्पा साकारला आहे. कागदी लगद्यापासून बाप्पा तयार करण्यात आला आहे. मुर्तीसाठी बांबूच्या काड्या, वर्तमान पत्र, टिशू पेपर, तारा, गव्हाची खळ आधी साहित्य वापरण्यात आल्याची माहिती मंडळाचे कार्यकर्ते विशाल चौधरी यांनी दिली.

# पक्षांना आवडणारी फळझाडे लावा, संवर्धन करा ! - दामू धादवड



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : पक्षांना आवडणारी ही फळझाडे लावून त्यांचे संवर्धन करावे असे पर्यावरण प्रेमी दामू धादवड यांनी व्यक्त केले आहे.

आपल्या सभोवती आपण बरेच पक्षी पहातो. त्यातील काही पक्षी आपल्याला नेहमीच दिसतात तर काही पक्षी आपल्याला कधीतरी तर काही पक्षी हे पहिल्यांदाच दिसत असतात. यामध्ये आपल्या निवासाच्या आसपास चिमण्या, कावळे हे रोजच दिसतात. भारद्वाज, मैना, बगळे, तारवाली, खड पाकोळी, दयाळ, नाचरा, बुलबुल हे अधून मधून तर आपले घर जर गावाच्या, शहराच्या एकाबाजूला असेल किंवा घराजवळ बऱ्यापैकी झाडे-झुडुपे असतील थोडेफार नियमित पाणी असेल तर कधीतरी तांबट, पोपट,खाटीक, सूर्यपक्षी, हळद्या ह्या पक्षांचे दर्शन होत असते. त्यातच परिसर शांत असेल, बऱ्यापैकी खाद्य मिळत असेल तर पक्षी त्या ठिकाणी नियमित येत असतात.

त्यामुळे आपल्याला वृक्षारोपणाची व पक्षी निरीक्षणाची आवड असेल तर आपण वड, पिंपळ, पायर या झाडांची लागवड करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. कारण ह्या झाडांची फळे खाण्यासाठी अनेक पक्षी गोळा होतात. त्यातल्यात्यात पायराची फळे जवळपास सर्वच पक्षांना आवडतात. शिवाय पायराला जेव्हा फळे येतात, ती पिकतात तेव्हा त्याला पाने नसतात. त्यामुळे पक्षी निरीक्षण व छायाचित्रण फार चांगल्या प्रकारे करता येते.त्याची फळे फार चविष्ट असतात. ती आपणही खाऊ शकतो असे धादवड यांनी म्हटले आहे.

वड, पिंपळ ही झाडे लावायची असल्यास त्यांची रोपे नर्सरीत सहज मिळतात मात्र पायराची रोपे मिळत नाहीत. पायराची रोपे, लहान झाडे ही खडक, इमारती, उंच भिंती या ठिकाणी रुजलेली दिसतात. पक्षांमार्फत त्याचे बी या ठिकाणी पोहोचलेले असते. ज्या ठिकाणी या लहान झाडाला चांगले भविष्य नसेल त्या ठिकाणी वाढलेले रोप काढून ते काही वर्षे पिशवीत लावून नंतर खडकाळ जमिनीवर ते लावता येते तर पायर हा खडाकाच्या ठिकाणी सहज जगतो म्हणून त्याला खडक पायर असेही म्हणतात. ह्या पायराची झाडे लावून आपण पक्षी संवर्धनाला हातभार लावू शकता असे विचार धादवड यांनी मांडले आहेत.




# प्रसाद चिकित्सा संस्थेकडून विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता


झिडके-अंबाडी: भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी येथील प्रसाद चिकित्सा ही धर्मदाय संस्था,केसर आशिष को-ऑप.सोसायटी कांदिवली आणि एस.ए.एस्.फाउंडेशन मालाड यांच्या संयुक्त विद्यमाने दुर्गम भागातील एकूण- 43 शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले आहे.हा कार्यक्रम प्रसाद चिकित्सा संस्थेच्या " मौजे-गोराड फार्म हाऊस" येथे आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून " यगनेश भट " यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी श्री.यगनेश भट यांनी आपल्या मनोगतात म्हटले की,आर्थिक



अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबते,परंतु "प्रसाद चिकित्सा" अशा गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक बाबतीत नेहमीच मदतीचा हात देतात,त्याबद्दल प्रसाद चिकित्सा संस्थेचे यावेळी अभिनंदन केले. त्यानंतर प्रसाद चिकित्सा धर्मदाय संस्थेचे कार्यकारी व्यवस्थापक "मिलिंद नरगुंद" यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की," विद्यार्थी हे ख-या अर्थाने देशाचे भवितव्य आहे " आणि त्यांना योग्य वेळेस शैक्षणिक बाबतीत मदत मिळाल्यास ते निश्चितच प्रगती करतील असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला. त्याचबरोबर उपस्थित पाहुण्यांच्या हेही निदर्शनास आणून दिले की,प्रसाद चिकित्सा संस्थेकडून आत्तापर्यंत जवळपास एकूण-300 विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक कार्यास साह्य केले आहे.

यावेळेस सायकली वाटप लाभार्थी अत्यंत आनंदीत झाले होते,यापैकीच इयत्ता 10 वीत शिकणारी विद्यार्थीनी" प्रिती वरठा" हिने प्रातिनिधिक स्वरूपात प्रसाद चिकित्सा संस्थेचे मनःपुर्वक आभार व्यक्त करून,म्हटले की,मी लांबवरून पायी प्रवास करून शाळेत येत आहे,आत्ता मात्र माझी चिंता मिटली असून,यापुढे मी शाळेत उशीरा न येता वेळेत येईन.मला तर खूप आनंद झाला आहेच,त्याचबरोबर माझ्या सर्व मित्रमैत्रिणींना अतिशय आनंद झाला आहे,त्याचे वर्णन मी करू शकत नाही,अशाप्रकारे कृतज्ञतापूर्वक भावना या प्रसंगी व्यक्त करण्यात आल्या.अशा प्रकारे प्रसाद चिकित्सा संस्था आयोजनातून शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप हा उपक्रम राबविण्यात आला.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024